# गुणवत्तेसाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण

## डॉ. रथ : के. के. वाघ शिक्षण संस्थेत वेबिनार

**सकाळ वृत्तसेवा**

पंचवटी, ता. १० : शिक्षकांनी नवीन शैक्षणिक धोरणानानुसार गुणवत्ता राखणे आणि वाढविण्यासाठी शिकवण्याच्या विविध पद्धती आत्मसात करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर मूल्यांकनाच्या नवीन पद्धती आणि नॅक व एनबीए यासाठी परिणामावर आधारित शिक्षण पद्धती समजावून घेणे आणि त्याचे अवलंबन करणे गरजेचे असल्याचे मत राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेचे सल्लागार डॉ. अमिया कुमार रथ यांनी व्यक्त केले.

के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय व इंडियन सोसायटी ऑफ टेक्निकल एज्युकेशन, कॉलेज चॅप्टर यांच्यातर्फे शिक्षक दिनानिमित्त मंगळवारी (ता.८) दुपारी तीनला ऑनलाइन वेबिनार झाला. त्या वेळी ते 'अध्यापन-शिक्षणाच्या प्रक्रियेची गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षकांची भूमिका व जबाबदारी' याविषयावर बोलत होते.

संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर, शिक्षेकतर कर्मचारी राजाराम टोपे व भगवान बचाटे यांचा सत्कार झाला. तसेच डॉ. शांताराम कडलग यांचाही विशेष सत्कार झाला.

कोरोना पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ तयार केल्याबद्दल प्रा. अपूर्व वैद्य, प्रा. गणेश जाधव, प्रा. शीतल वाणी, प्रा. प्रतीक कदम व डॉ. पी. आर. चौधरी यांचा सत्कार झाला. प्रा. मंजूषा भोसले, प्रा. पी. पी. आहेर व प्रा. अभिजित पवार यांना उत्तेजनार्थ गौरवण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त समीर वाघ, अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, सचिव प्रा. के. एस. बंदी आणि प्राचार्य प्रा. डॉ. केशव नांदुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक दिन झाला. डॉ. प्रीती भामरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शिरीष साने यांनी आभार मानले.

**11/09/2020,**
**Sakal**